# इमामी रिलाँच करत आहे हेल्दी अँन्ड टेस्टी खाद्यतेल श्रेणी

## अभिनेते कतरिना कैफ व रवी किशन ब्रॅण्ड एण्डॉर्स करणार; नवीन अवतारातील ट्रेण्डी पॅकेजिंगसह ब्रॅण्डचा मेकओव्हर

***औरंगाबाद । वार्ताहर***

वैविध्यपूर्ण उद्योग संघटन इमामी समूहाचा ब्रॅण्डेड अन्न उत्पादन विभाग असलेल्या इमामी अग्रोटेक लिमिटेडने, भारतातील सर्वांत लोकप्रिय व आघाडीच्या खाद्यतेलाच्या ब्रॅण्ड्सपैकी एक हेल्दी अँड टेस्टी रिलाँच केला आहे. २०१० मध्ये बाजारात आलेला इमामी हेल्दी अँड टेस्टी हा ब्रॅण्ड पश्चिम बंगालमधील बाजारपेठेत आघाडीच्या स्थानावर आहे आणि २०१७ साली राष्ट्रीय स्तरावर लाँच करण्यात आल्यापासून, उत्तर व पश्चिम भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या ब्रॅण्ड्सपैकी एक आहे. या रिलाँचच्या माध्यमातून पुढील ३-५ वर्षांत व्यवसायाची उलाढाल ५००० कोटी रुपयांवर नेण्याचे उद्दिष्ट



ब्रँडने ठेवले आहे.

या रिलाँचचा एक भाग म्हणून इमामी हेल्दी अँड टेस्टीने आपल्या मस्टर्ड (राई तेल), सोयाबीन, सनफ्लॉवर (सूर्यफूल) आणि राइस ब्रान या चार प्रकारांमध्ये पूर्णपणे नवीन पॅकेजिंग मेकओव्हर केले आहे. नवीन पॅकेजिंग अत्यंत आधुनिक, समकालीन व आटोपशीर स्वरूपाचे आहे आणि खाद्यतेल विभागात वेगळे उठून दिसणारे आहे. या नवीन पॅक्समध्ये अव्वल दर्जाच्या प्रतिमा आहेत आणि ब्रॅण्डच्या भारतीयत्वात रुजलेली नैसर्गिक वैशिष्ट्यपूर्ण ओळख सांगणारी उगमकथा या प्रतिमांमधून उलगडली जाते. ब्रॅण्डने अभिनेत्री कतरिना कैफला आपली देशभरातील ब्रॅण्ड अँबॅसडर म्हणून घेतले आहे. ती ब्रॅण्डच्या मस्टर्ड ऑइलच्या जाहिरातीत सुपरस्टार रवी किशन सोबत दिसणार आहे. आपल्या नवोन्मेष व उत्कृष्टतेच्या सातत्यपूर्ण प्रक्रियेचा भाग म्हणून इमामी अग्रोटेकने भारतात प्रथमच 'अल्ट्रा लाइट' सोयाबिन तेल आणले आहे. हा सोयाबिन तेलाचा सर्वांत सौम्य



(लाइट) प्रकार असून, कंपनीच्या संशोधन व विकास तसेच तांत्रिक टीमने जागतिक तंत्रज्ञानविषयक तज्ज्ञांच्या मदतीने हा प्रकार विकसित केला आहे. उत्पादनाच्या प्रक्रियेत वापरल्या गेलेल्या युरोपीय शुद्धीकरण तंत्रज्ञानामुळे, फिकट रंगाचे, कमी चिकट आणि पदार्थात कमी शोषले जाणारे, तेल तयार झाले आहे. नवीन युगातील आरोग्याबाबत जागरूक ग्राहकांसाठी हा अधिक आरोग्यपूर्ण पर्याय आहे.

इमामी अग्रोटेक लिमिटेडच्या मार्केटिंग विभागाचे अध्यक्ष श्री. देबाशीष भट्टाचार्य या रिलाँचबद्दल म्हणाले, यशस्वी ब्रॅण्डने ताजेपणा कायम राखण्यासाठी तसेच ग्राहकांना उपयुक्त राहण्यासाठी उत्क्रांत होत राहावे लागते. गतीशील ग्राहक प्राधान्यांमुळे निर्माण झालेल्या गरजांना प्रतिसाद म्हणून, ब्रॅण्डने योग्य प्रकारे जोडले जाणे महत्त्वपूर्ण असते. म्हणूनच आमच्या नवीन पॅकेजिंगचे स्वरूप स्मार्ट, आटोपशीर आहे, कारण आम्हाला एक आधुनिक, प्रगतीशील ब्रॅण्ड म्हणून स्वत:ला प्रस्थापित करायचे आहे. अल्ट्रा लाइट सोयाबीन तेल




बाजारात आल्यामुळे इमामी हेल्दी अँड टेस्टी हा ब्रॅण्ड अधिक व्यापक स्तरावर ग्राहकांना जिंकून घेण्यात यशस्वी ठरेल असेही आम्हाला वाटत आहे. ब्रॅण्ड टेलीव्हिजन, मुद्रित माध्यमे, ओओएच व डिजिटल अशा सर्व मार्गांनी ३६० अंशीय मार्केटिंग दृश्यमानता निर्माण करण्यासाठी गुंतवणूक करत आहे आणि त्यायोगे या विभागातील सर्वाधिक लक्षवेधी ब्रॅण्ड ठरणार आहे. इमामी हेल्दी अँड टेस्टी आपल्या नवीन स्वरूपात वेगवेगळ्या पॅक आकारमानांमधील पाउच, बाटल्या व जार्समध्ये स्पर्धात्मक दरबिंदूंना उपलब्ध होईल.